INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# शिवकालीन न्यायालयीन कार्यपध्दती व वैशिष्ट्ये – एक दृष्टिक्षेप
# (Judicial Working during Shivaji Maharaj Tenure: One Aspect)

**डॉ. कैलास ज्ञानोबा सावंत**

इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड (महाराष्ट्र, भारत)
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686** **DOI Link :: https://doi-ds.org/doilink/03.2024-72174966/IRJHIS2403033**

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासात अभ्युद्याचा कालखंड होय. इस्लामी सत्तेच्या राजकीय नियंत्रणाखाली दबलेल्या समाजाला राष्ट्रभक्तीच्या विचारांनी जागृत करण्याचे, कार्यक्षम बनविण्याचे व त्यांच्या मदतीने व स्वसामर्थ्यावर महाराष्ट्रात 'स्वतंत्र राज्य' स्थापन करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. राष्ट्रनिर्मितीबरोबरच या राष्ट्राचा कारभार करणाऱ्या निरनिराळ्या संस्था त्यांनी निर्माण केल्या. त्यांची कार्यपध्दती ठरविली. त्यांच्या कार्याला विशिष्ट व वेगळी दिशा दिली. 'नि:पक्षपातीपणे न्यायदानाचे कार्य करीत असलेल्या शासनावरच लोकांचा विश्वास बसतो.' या तत्वांची छत्रपती शिवाजी महाराजाला जाणीव होती, म्हणूनच या काळात न्यायसंस्थेची कार्यपध्दती व वैशिष्ट्ये यांना निश्चित स्वरुप देणे व ते कायम टिकविणे याकडे छत्रपती शिवाजी महाराजांनी विशेष लक्ष दिले.

**शिवकालीन न्यायसंस्थेचे स्वरुप :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी न्यायसंस्थेच्या स्वरुपाची आखणी करताना आदिलशाही शासन पध्दतीतील काही गोष्टींचा स्वीकार केला असला तरी त्यांनी आपल्या गरजेनुसार व परंपरेनुसार त्यात आवश्यक ते बदल घडवून आणले. राजा हा राजकीय जीवनाप्रमाणेच धार्मिक व सामाजिक जीवनाचाही प्रमुख मानलेला होता. त्यामुळेच राजाचे न्यायालयीन अधिकार श्रेष्ठ मानलेले होते. राजमंडळ किंवा 'हुजूर हजिर मजलिस' हे राजाच्या वतीने श्रेष्ठ न्यायालय म्हणून काम करीत असे. हुजूर मजलिसमध्ये या राजमंडळातील सभासदांबरोबरच

गोतसभेचाही समावेश होता. महत्वाच्या खटल्याच्या बाबतीत किंवा पुनर्परीक्षणासाठी (Appeal) आलेल्या खटल्यांच्या बाबतीत न्यायदान करण्याचे काम 'हुजूर मजलिस' करीत असे. हुजूर मजलिसला 'धर्मसभा' असे ही म्हणत. इस्लामी सत्तेत 'मजलिस' च्या मदतीन फक्त स्थानिक न्यायालयातच न्यायदान केले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी केंद्रिय सत्तेच्या प्रमुख न्यायालयातही मजलिस किंवा गोतसभेच्या मदतीने न्यायदान करण्याची पध्दत स्वीकारली. छत्रपती शिवाजी महाराजांनी खराडे व काळभोर यांच्यामधील पालीचे पाटिलकीचे वाद निर्णयार्थ स्वत: धर्मसभा बोलविली. इ.स.1675 मध्ये राजमुद्रा व इतर सरकारी अधिकारी 29 होते व देशमुख-देशपांडे, पाटील-कुलकर्णी व प्रजा मिळून 209 गोतांपैकी होते. एकूण 238 सभासद उपस्थित होते.[1]

छत्रपती शिवाजी महाराजांने स्वराज्यांचे तीन प्रमुख विभांगात विभाजन केलेले असून ते विभाग पंतप्रधान, अमात्य व मंत्री यांच्या नियंत्रणाखाली होते. या प्रमुख तीन विभागाचे सरसुभा (प्रांत), सुभा किंवा परगाणा (जिल्हा), तर्फ (तालुका) व ग्राम असे विभाजन केलेले होते. सरसुभ्याला काही वेळा प्रांत राजमंडळ म्हणत. सरसुभ्याच्या ठिकाणी न्यायदानाच्या बाबतीत मजलिसची (गोतसभेची) मदत घेतली जात होती किंवा नाही हे निश्चितपणे आढळत नाही. सुभ्याच्या प्रमुखाला सुभेदार किंवा 'दिवाण' म्हणत. त्याच्या मदतीला मुजुमदार व कारकून असत. न्यायदानाचे काम सुभामजलिस करी. त्यात सुभेदार, अधिकारी, सुभ्यातील देशमुख-देशपांडे, शेटे-महाजन, सुभ्यातील खेड्यांचे पाटील, नाईकवाडी (पोलिस), मिरासदार व प्रतिष्ठीत लोक यांचा समावेश होता. 'तर्फ' या विभागाच्या न्यायालयीन कामकाजात अधिकारी, देशमुख देशपांडे, शेटे, महाजन, नाईकवाडी पाटील, कुलकर्णी, चौगुला व बलुतेदार (सोनार, शिंपी, माळी, तेली, सुतार, लोहार, परीट, न्हावी, मुलाणा, कुंभार, चांभार, गुरव वगैरे) यांचा समावेश होता, तर ग्रामाच्या 'मजलिस' मध्ये मोकदम, कुलकर्णी, चौगुला, बलुतेदार, थळकरी, किंवा मिरासदार व लोकांचे प्रतिनिधी किंवा सर्वसामान्य लोक यांचा समावेश होता. धर्मज्ञान, परंपरा यांचे ज्ञान असलेला 'सभासद' व मुस्लिम धर्म प्रमुख 'काजी' यांचा हुजूर व सुभा मजलिसमध्ये समावेश होता.

हुरूर मजलिस, सुभा मजलिस, तर्फ मजलिस किंवा ग्राम मजलिसमध्ये न्यायदानाचे काम अधिकारी व या गोतसभेच्या सभासदांसमोर चाले. नि:पक्षपातीपणे न्यायदान करुन सर्वांच्या संमतीने निर्णय घेतला जाई. महजरवर या सभासदांच्या सह्या किंवा खुणांची चिन्हे काढली जात. त्यानंतरच त्या निर्णयाला महत्व मिळे. या खुणाही ठरलेल्या होत्या उदा. शेटे महाजन-तराजू, पाटील-नांगर, चांभार-रापी, इत्यादी या महरजरमधील निर्णयाची अंमलबजावणी शासकीय अधिकारी करीत.

यापैकी कोणत्याही विभागात न्यायदानाचे काम एकटा राजा किंवा शासकीय अधिकारी करीत नसे. गोतसभेचे सभासद, धर्मज्ञाते व व्यवहारज्ञ यांचे सहाय्य घेतले जात होते. विविध गटांतील चाणाक्ष लोक व व्यावसायिक आपल्या गटातील अपराधी व त्याच्या अपराधाचे स्वरुप सहजपणे ओळखू शकत, तसेच गुन्हेगार व साक्षीदारही आपल्या लोकांसमोर खोटी माहिती द्यावयास धजत नसे. त्यामुळे न्यायदान योग्य व नि:पक्षपातीपणे होत

असे. तसेच लोकांना तात्काळ, विनाखर्च किंवा अल्पखर्चात नि:पक्षपातीपणे व त्यांच्या ठिकाणीच न्याय मिळू शकत असे. तसेच लोकांना तात्काळ, विनाखर्च किंवा अल्पखर्चात नि:पक्षपातीपणे व त्यांच्या ठिकाणीच न्याय मिळू शकत असे. आपले ठिकाण सोडून दुसरीकडे न्यायासाठी धाव घेण्याची त्यांना गरज राहिली नाही, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेले हे न्यायसंस्थेचे स्वरुप लोकप्रिय झालेले दिसते.

**न्यायलयीन कार्यपध्दतीचे स्वरुप :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात लिखित स्वरुपाचा कायदा किंवा कार्यपध्दतीचे स्वरुप आढळत नाही तथापि उपलब्ध होणाऱ्या विविध न्यायनिवाड्यांच्या महजरवरुन त्या काळातील कायदा व न्यायलयीन कार्यपध्दतीच्या स्वरुपावर प्रकाश टाकता येतो. श्रुति व स्मृतिप्रणीत नियमाला तसेच परंपरागत चालीरीती, शिष्टाचार यांना कायदा मानलेले होते. याशिवाय वर्ण जातिसंस्थेचे समाजाने मान्य केलेले काही नियम, धर्मपालन, राष्ट्रपालन व प्रजापालनाच्या दृष्टीने आवश्यक असलेले व परंपरेने चालत आलेले नियम यानांच कायदा मानले जात असे. राजा किंवा शासकीय अधिकारी या परंपरागत कायद्यात बदल करीत नसत. वतन, कुटुंब-सदहद्दी, धार्मिक बंधनाचे वा जातिबंधनाचे पालन, सामाजिक जिवनातील काही शिष्टचारांचे नियम यांना कायदा म्हणून मान्यता मिळालेली असून त्याच्या मदतीनेच न्यायदान केले जात होते. विवाह,[2] संपतीची वाटणी[3] वारसहक्क, दत्तकविधान याविषयाच्या बाबतीत समाजाने मान्या केलेल्या व परंपरेने चालत आलेल्या नियमांनाच कायदा म्हणून मान्यता होती. राष्ट्ररक्षणाच्या दृष्टीने काही गुन्ह्यांना गंभीर शिक्षाही दिली जात असे. कारण या नियमांचे समाजात काटेकोरपणे पालन होणे आवश्यक मानलेले होते.

शिवकालीन न्यायलयीन कार्यपध्दती ठरावीक पध्दतीची होती व तिचे येथील समाजाला पूर्ण ज्ञान होते असे दिसते.[4] वादी शक्यतो ज्या विभागात घटना घडली असेल तेथेच आपली तक्रार किंवा खटला नोंदवीत असे.[5] तथापि वादीला कोणत्याही ठिकाणी आपला खटला दाखल करण्याची मुभा होती असे दिसते.[6] सामान्यत: ज्या विभागात घटना घडली असेल त्या तर्फच्या किंवा सुभ्याच्या हवालदाराकडे वादीची ही तक्रार येई. हा खटला धार्मिक बाबीसंबंधी किंवा जातिबंधनाच्या संबंधी असेल तर तो खटला धर्मसभा किंवा जातिसभेकडे निर्णयासाठी पाठविला जात असे या प्रश्नांच्या बाबतीत त्या त्या सभाचे अधिकार श्रेष्ठ मानले जात.

वादीने खटला दाखल केल्यानंतर शासकीय अधिकारी स्वत: किंवा देशमुखाच्या मदतीने मजलिस सभासदांना निमंत्रित करीत असे. मजलिसची बैठक बहुदा पिंपळाच्या पारावर, मंदिरात किंवा चावडीत भरत असे. मजलिसच्या बैठका जेष्ठ व माघ महिन्यात सामान्यत: भरत या बैठकांचा सभानायक म्हणून सुभे मजलिसमध्ये देशमुख ग्राम मजलिसमध्ये मोकदम, कसवा किंवा पेटा मजलिसमध्ये शेटे-महाजन काम पाहत असे. तर तीर्थक्षेत्र किंवा पवित्र ठिकाणी भरणाऱ्या ब्रम्हसभेच्या धर्माधिकारी सभानायक असे.[7] वादी आपल्या अर्जात (करीना) घटनेचे पूर्ण वर्णन व आपणावर झालेल्या अन्यायाची संपूर्ण माहिती देत असे.[8]

मजलिसच्या बैठकीच्या वेळी प्रथम वादीकडून घटनेची माहिती घेतली जाई, तसेच त्याचे म्हणणे मत समजावून घेतले जाई. संबंधीत शासकीय अधिकारी नाईकवाडी (पोलिस) पाठवून प्रतिवादीला मजलिसच्या बैठकीसमोर बोलावून घेत असे. प्रतिवादीचे म्हणणे सविस्तरपणे लिहुन घेतले जाई. प्रतिवादीने किंवा आरोपीने वादीने केलेला आरोप सामान्य केल्यास या न्यायदानाचे कामकाज पुढे चालू केले जाई. त्याने आरोप स्वीकारल्यास निर्णय घेऊन महजर तयार केली जात असे. न्यायालयीन कामकाजाच्या सविस्तर सुरुवातीपूर्वी वादी व प्रतिवादीकडून मजलिसने दिलेले निर्णय आम्हाला मान्य आहे व आम्ही त्याप्रमाणे वागु असे प्रतिज्ञापत्र (राजीनामा) साक्षीदारांसमोर लिहून घेत. खटला चालू असताना न्यायालयात उपस्थितीबद्दल व चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन घेतला जाई. वादी व प्रतिवादीचे मत ऐकून घेऊन कामकाजाला सुरुवात केली जात असे. वादी व प्रतिवादीला आपल्या मताच्या पुष्टयर्थ लिखित पुरावे व साक्षीदार आणावे लागत. लिखित पुराव्यांना विशेष महत्व होते. साक्षीदाराची पूर्ण तपासणी केली जाई, त्यांचे म्हणणे लिहून घेतले जात असे. लिखित पुरावा किंवा साक्षीदार यांच्याशिवाय वादी किंवा प्रतिवादीने मागणी केल्यास 'दिव्य' केले जात असे. अशा दिव्याची उदाहरणे दिव्य प्रकारात जास्त दिसतात. सर्व प्रकारचा पुरावा ऐकून घेतल्यानंतरच निर्णय घेतला जाई.

यासाठी मजलिसच्या दोन किंवा तीन बैठका होत काही खटल्यांच्या बाबतीत तीन महिन्यांतही निर्णय घेतला जात असे. मजलिसच्या कार्यपध्दतीवर देखरेख ठेवणे व विनाकारण विलंब होणार नाही याची दक्षता घेणे हे शासकीय अधिकाऱ्याचे काम असे. सभेनी दिलेल्या निर्णयाची महजर लिहिली जात असे. महजरमध्ये वादीच्या अर्जाचा थोडक्यात मसुदा, प्रतिवादीचे उत्तर, दोघांचा लिखित पुरावा, साक्षीदार, त्यांचे हुद्दे व त्यांचे मत, चर्चा, सभ्यांचे मत व शेवटी सभेचा निर्णय. या महजर वर सभानायकाबरोबर सभेला जमलेल्या सर्व सभासदांची नावे व चिन्हे असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी महजरलेखनाची पध्दत इस्लामी सतेपेक्षा बदलली असून, ती स्मृतिग्रंथातील 'जय-पत्राशी' मिळती जुळती होती. देशकुलकर्णी व कुलकर्णी हे अनुक्रमे सभा व कसबा-ग्राम येथील मजलिसच्या सर्व लेखनाचे कार्य करीत. ते एकमेकांच्या अधिकारांवर अतिक्रमण करीत नसत. महजर सामान्यत: कागदावर लिहीत. महजर 5 ते 20 फूट लांब व 4 ते 6 इंच रुंद असे. कागदाचे तुकडे एकसारखे एकमेकांना चिकटवून ती लांब केलेली होती. चिकटविलेल्या ठिकाणी मागच्या बाजूस शिक्के मारीत. त्यामुळे खोटा कागद तयार करण्याची भीती राहत नसे. महजरच्या सुरुवातीच्या काही ओळी देशपांडे किंवा कारकुन आपल्या हस्ताक्षरात लिहित. निरनिराळ्या वतनदार व सभासदांच्या त्याखाली सह्या किंवा चिन्हे घेतली जात. महजर बांबूच्या नळकांड्यात किंवा दगडीत ठेवून त्यांचे रक्षण करीत.

मजलिसने महजर यशस्वी पक्षाला दिल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्या विभागाच्या प्रमुख शासकीय अधिकाऱ्यावर पडत असे. तो अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना त्याचप्रमाणे सूचना पाठवित असे.[9] वादी व प्रतिवादीकडून अगोदरच 'वर्तुणूक जामीन' घेतलेला असल्याने या निर्णयाच्या

अंमलबजावणीची खात्री असे.

**पुनर्परीक्षण (appeal) व बदल :**

खटला चालवीत असताना वादी व प्रतिवादीच्या, खटला चालविण्याविषयीच्या समाधानाकडे विशेष लक्ष दिले जात होते. त्यांनी जर खटला दुसऱ्या ठिकाणी हलविण्याची मागणी केली तर ती स्वीकारली जात असे.[10] ज्या ठिकाणी घटना घडली तेथील मजलिसकडून योग्य निर्णय मिळणार नाही असे संबंधितांना वाटल्यस त्यांना दुसऱ्या स्थळी पाठवले जाई[11] किंवा मयस्थळाच्या मजलिसला योग्य निर्णयासाठी हा खटला दुसरीकडे पाठविणे आवश्यक वाटल्यास तो पाठविला जात असे.[12] थळाच्या निर्णयाला थळपत्र म्हणत. थळपत्र मिळाल्यानंतर मयथळ मजलिस महजर तयार करीत असे. धार्मिक बाबीसंबंधीचे खटले तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या (ब्रम्हसभाकडे) पाठविण्यात येत. शिवकाळात न्यायालयांच्या बाबतीत जेष्ठताक्रम ठरविलेला नव्हता. तसेच प्रत्येक न्यायालयाचे कार्यक्षेत्रही ठरवून दिलेले नव्हते. त्यामुळे यापैकी कोणत्याही न्यायालयाला अपील न्यायालय म्हणत येत नाही. तथापि सामान्यत: स्थानिक न्यायालयात मिळालेल्या निर्णयाविरुध्द पुनर्परीक्षणासाठी (appeal) वादी किंवा प्रतिवादीला जेष्ठ प्रशासकीय विभागाच्या न्यायालयात जाता येत असे. हुजूर मजलिस पर्यंत तक्रार नेण्याची मुभा होती.

न्यायालयीन शुल्कविषयी नियम ठरलेले नव्हते. तथापि निर्णय झाल्यानंतर विजेत्या किंवा पराभूत पक्षाकडूनही दिवाण किंवा शासकीय अधिकारी 'हिरकी' किंवा 'गुन्हेगारी' (शुल्क) घेत असे. एखाद्या पक्षाला शुल्क देणे अशक्य असल्यास त्याला सूट दिली जात होती. विजयी पक्ष आपल्या आर्थिक कुवतीनुसार गोतसभेच्या सभासदांना जेवण व भेट म्हणून वस्त्रे देत असे.

वैशिष्ट्यपूर्ण किंवा महत्वाच्या खटल्यांच्या बाबतीत खटल्याचा निकाल लागेपर्यंत खटल्याशी संबंधीत असलेली स्थानावर किंवा जंगम संपती शासन ताब्यात घेई. कित्येकदा खटल्याचा निकाल लागेपर्यंत वादी व प्रतिवादीला नजरकैदेत किंवा तुरुंगात ठेवण्याचीही तरतूद होती.

आधुनिक काळातील न्यायसंस्थेचे स्वरुप व कार्यपध्दतीशी तुलना करु पाहता या पध्दतीत काही त्रुटी जाणवतात. या काळात कायदा किंवा न्यायालयीन कार्यपध्दतीचे नियम लिखित स्वरुपात नव्हते. आधुनिक काळाप्रमाणे कायदेविषयक कार्यकारी व न्यायदानविषयक कार्य करणाऱ्या स्वतंत्र शाखा नव्हत्या. तथापि महाराष्ट्रात 'स्वराज्य' स्थापनेच्या या प्रयत्नांना राजकीय, सामाजक व धार्मिक प्रेरणांचे सहकार्य होते. या काळातील जीवनात या तीनही घटकांचे संमिश्रण झालेले दिसते. त्यामुळेच त्या काळातील संस्थामध्येही या तीनही घटकांचे प्रतिबिंब जाणवते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इस्लामी सतेपासून चालत आलेल्या परंपरा स्वीकारल्य असल्या तरी त्यात आवश्यक ते बदल केले. सामाजिक स्थैर्यासाठी स्वीकारलेल्या धार्मिक व सामाजिक बंधनांना कायद्याच्या स्वरुपात स्थान मिळवून दिले. त्यामुळेच हा कायदा लिखित नसला तरी सर्व समाजाला तो ज्ञात होत असा मानता येई.

'Elphinstone admits that till the end of the peshwa period every man was tolerably acquainted with the rules of civil cases, even in the absence of the coditfied low.[13]'

या काळात न्यायालयासमोर सर्वांना समान मानले जात होते. विशिष्ट गुन्ह्याबद्दल सरदारांनाही शिक्षा होती. त्याप्रमाणे सर्वसामान्यालाही होत असे. या काळात हा सर्वोच्च मानलेला असला तरी त्याला धर्मसंस्था व जातिसंस्थेचे नियम पाळावेच लागत. त्या नियमांमध्ये बदल करण्याचा त्याला अधिकार नव्हता. राजा किंवा न्यायधीश असा कोणताही एक माणूस न्यायदानाचे काम करु शकत नसे. मजलिसशिवाय न्याय दिला जात नसे. राजा, प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित राहत पण मजलिसच्या कार्यात किंवा निर्णयात त्यांना हस्तक्षेप करता येत नव्हता. यावरुन काही प्रमाणात न्यायसंस्थेला स्वतंत्र अस्तित्व होते असे मानता येते.

स्थानिक किंवा केंद्रीय ठिकाणच्या मजलिसची कार्यपध्दती एकच होती. त्याच्या कार्यक्षेत्राविषयी श्रेणी ठरलेली नसली तरी स्थानिक मजलिसचा निर्णय पसंत न पडल्यास सामान्यत: वरच्या प्रशासकीय विभागाच्या मजलिसकडे कोणत्याही पक्षाला जाण्याची मुभा होती. हुजूर मजलिसपर्यंत त्यांना जाता येत असे. वादी व प्रतिवादीच्या पूर्ण समाधानापर्यंत पुनर्परीक्षण किंवा appeal करण्याची संधी होती. घटना घडल्यापासून इतक्या दिवसांतच खटला दाखल करावा असे बंधन नव्हते. केंव्हाही तो दाखल करता येत असे.

निरनिराळ्या प्रशासकीय विभागाच्या मजलिसमध्ये स्थानिक लोकांचा समावेश असल्याने योग्य न्याय मिळण्याची जास्त शक्यता होती. खोट्या साक्षी लगेच समजू शकत असत, किंवा खोटा पुरावा सादर करण्याचा प्रयत्न केला जात असे. मजलिसचे सभासद नि:पक्षपातीपणे न्यायदान करण्याचा प्रयत्न करीत. वादी व प्रतिवादीने सादर केलेला लेखी पुरावा काटेकोरपणे तपासला जाई. इतकेच नव्हे तर एखाधा पुराव्या विषयी शंका निर्माण झाल्यास त्यातील मजकुराची व साक्षीदारांची तपासणी केली जात असे. लेखी पुराव्यानंतर साक्षीदारांनी दिलेली माहिती तपासली जाई. तसेच वादी-प्रतिवादीच्या मतानुसार दिव्य करुन परमेश्वराच्या अप्रत्यक्ष शक्तीचे सहकार्य घेतले जाई. नि:पक्षपातीपणे न्यायदान करण्याच्या पध्दतीच्या बाबतीत वादी व प्रतिवादीच्या मतालाही महत्व दिले जात असे.

मराठा काळातील या न्यायदानाच्या पध्दतीत वकीलवर्गाला स्थान नव्हते. तसेच खटला दाखल करताना कोणतेही न्यायालयीन शुल्क भरावे लागत नसे. त्यामुळे लोकांना स्थानिक ठिकाण नि:शुल्क किंवा कमी खर्चात न्याय मिळण्याची सोय होती. आधुनिक काळातील न्यायालयाच्या प्रचंड खर्चाशी तुलना करता ही पध्दत फारच योग्य होती असे दिसते. काही प्रमाणात हरकी किंवा शेरणी घेतली जात असली तरी एखाद्या व्यक्तीची असमर्थताच असल्यास नाममात्र शुल्क न घेताही निकाल दिला जाई व त्याची अंमलबजावणी केली जात असे.

फौजदारी गुन्ह्याच्या बाबतीत मात्र गुन्हेगाराला जास्तीत जास्त शिक्षा केली जाई. समाजात या गुन्हेगारी प्रवृतीची वाढ होऊ नये ही त्यामागील भूमिका असावी. मजलिसच्या या कार्यपध्दतीमुळे समाजातील तरुण वर्गाला

सामाजिक व धार्मिक जीवनातील परंपरांचे ज्ञान होत असे व या नियमांचे समाजात व्यवस्थितपणे पालन होई.

आधुनिक काळातील काटेकोर साचेबंद कायद्याचे व कार्यपध्दतीचे अस्तित्व या काळात नसले तरी परंपरेनी चालत असलेल्या सामाजिक व धार्मिक नियमांनाच येथे कायदा मानलेले होते. राजकीय जीवनात तयार केलेल्या व्यावहारिक नियमांनाही महत्व दिले जात असे व त्यांचाही कायदा म्हणून उपयोग केला जात असे. या काळातील समाजाला कायद्याचे व कार्यपध्दतीचे यथार्थ ज्ञान होते. म्हणूनच शिवकाळातील न्यायसंस्थेच्या स्वरुप व कार्यपध्दतीला वेगळे व महत्वपूर्ण स्थान आहे. न्यायदानाच्या पावित्र्यतेचे, वेगळ्या अस्तित्वाचे येथे व्यवस्थितपणे पालन केले जात होते.

**सारांश :**

स्वराज्य हे हिंदू पदपादशाहीच्या रक्षणासाठी निर्माण केलेले राज्य असले तरी न्यायसंसथेच्या बाबतीतही छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभावाची जाणीव ठेवलेली दिसते. मजलिसच्या वेळी काजीचे अस्तित्व व महजरवर त्यांची सही महत्वाची मानलेली होती. मुलाण्याचा बलुतेदारांमध्ये समावेश असून मजलिसमध्ये त्याला स्थान होते. शिवकाळातील एक महजरमध्ये पाटिलकीच्या खटल्याची माहिती आहे. वादी आलोजी हा मुसलमान होता तर प्रतिवादी हिंदु होता. तथापि प्रतिवादी हिंदु असूनही वादी दिव्यास उतरताच त्याला न्याय दिला. यावरुन या काळातील न्यायसंस्था नि:पक्षपातीपणे व धर्मजातिनिरपेक्ष भूमिकेतून, सर्वधर्म समभावनेच्या जाणीवेतून कार्य करीत होती, असे मानता येते.

**संदर्भ ग्रंथ सूचि :**


1. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड-पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-30, पृष्ठ 290
2. गुणे व्हि.टी., द ज्युडिकल सिस्टीम ऑफ द मराठाज – खंड पाच, पृष्ठ 21
3. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-20, पत्र क्रमांक 126, 127, 169
4. गुणे व्हि.टी., ज्युडिकल सिस्टीम ऑफ द मराठाज, खंड पाच, उपरोक्त, पृष्ठ 133
5. कुलकर्णी अ.रा. खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड-पहिला, उपरोक्त, पृष्ठ 291
6. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-20, उपरोक्त पृ. 92
7. किता, पृष्ठ 279
8. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-17, पत्र क्र.5, 4, पृष्ठ 41
9. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड 21, पत्र क्रंमाक-111,112
10. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-20, पत्र क्रंमाक-30
11. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-15, पत्र क्रंमाक-6
12. राजवाडे वि.का., मराठ्यांचा इतिहासाची साधने, खंड-20, पत्र क्रंमाक 217
13. गुणे व्हि.टी., द ज्युडिकल सिस्टीम ऑफ द मराठाज, खंड-पाच, उपरोक्त, पृष्ठ 133